**ठळक बातम्या**

- पश्चिम आशियातल्या संघर्ष स्थितीमुळे देशात एलपीजी पुरवठ्यावरच्या परिणामाबद्दल विरोधकांचा संसदेत गदारोळ / दोन्ही सदनांचं कामकाज २ वाजेपर्यंत तहकूब

- स्वयंपाकाचा गॅस आणि इतर पेट्रोलियम उत्पादनांचा काटकसरीने वापर करावा असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचं आवाहन

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज शेतकरी सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याचं वितरण

**आणि**

- आगामी एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचं स्थान निश्चित

**<><><><><>**

पश्चिम आशियातली संघर्ष स्थिती आणि त्यामुळे देशात एलपीजी पुरवठ्यावर झालेला परिणाम या मुद्द्यांवर विरोधकांनी गदारोळ केल्यामुळे लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं.

विरोधी पक्ष नेता राहुल गांधी जनतेच्या समस्या समजून घ्यायला नकार देत असल्याचा आरोप संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी केला.

सभागृहात आज दुसऱ्या टप्प्यातल्या पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला अर्थमंत्री निर्मला सीतारामन उत्तर देणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेने वक्तशीर सेवा देण्यात ७७ टक्के यश मिळवलं असून रेल्वेच्या २४ विभागांमधे वक्तशीरपणाचं उद्दिष्ट ९० टक्के पर्यंत साध्य झालं आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली. अद्ययावत तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून रेल्वेच्या वेळापत्रकातल्या त्रुटी दूर करण्यात येत आहेत, असं ते म्हणाले. देखभाल दुरुस्तीसाठी जपानी पद्धतीने २६ आठवडे आगाऊ नियोजन केलं जातं असं त्यांनी सांगितलं.

**- - - - होल्ड - बाईट - वैष्णव - - -**

विरोधकांच्या गदारोळामुळे राज्यसभेचं कामकाजही दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पेट्रोलियम उत्पादनांची संभाव्य टंचाई लक्षात घेता, नागरिकांनी स्वयंपाकाचा गॅस आणि इतर पेट्रोलियम उत्पादनांचा काटकसरीने वापर करावा असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयानं केलं आहे. याबाबत जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, देशात सध्या स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून, पुरेसा राखीव साठा उपलब्ध आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियामधल्या वाढत्या तणावाबद्दल संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी तीव्र चिंता व्यक्त केली असून, यामुळे जागतिक शांतता आणि सुरक्षेपुढे गंभीर संकट निर्माण झाल्याचा इशारा दिला आहे. या संघर्षामुळे सर्वसामान्य नागरिकांना हाल सोसावे लागत आहेत. युद्धात गुंतलेल्या सर्व पक्षांनी आंतरराष्ट्रीय कायद्यांचं पालन करावं आणि चर्चेकडे वळावं असं आवाहन त्यांनी केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियात यांच्याबरोबर दूरध्वीवरून चर्चा केली. पश्चिम आशियातला संघर्ष, वाढता तणाव आणि भारतीय नागरिकांची सुरक्षितता या मुद्यांवर चर्चा झाली. वाटाघाटीच्या मार्गाने प्रश्न सोडवण्याचे आवाहन मोदी यांनी केलं.

**<><><><><>**

इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये इराणचे प्रमुख अणुशास्त्रज्ञ मारले गेले असल्याचा दावा इस्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांनी केला आहे. इराणचे नवे सर्वोच्च नेते अयातुल्ला मोज्तबा खामेनेई हे रिव्होल्युशनरी गार्डचं बाहुलं असल्याचं म्हणत सार्वजनिक ठिकाणी ते उपस्थित राहू शकत नाहीत, असं नेतान्याहू यांनी पत्रकार परिषदेत म्हटलं. त्यांनी इराणी नागरिकांना संबोधित करत त्यांना स्वातंत्र्याच्या नव्या मार्गावर पोहोचण्याचा क्षण जवळ आला असल्याचं म्हणत शेवटी ते त्यांच्या हातात असल्याचं देखील नमूद केलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जागतिक ऊर्जा बाजारपेठेत स्थैर्य आणण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नाचा भाग म्हणून, अमेरिकेनं आपल्या 'धोरणात्मक पेट्रोलियम साठ्या'मधून सुमारे १७२ दशलक्ष बॅरल्स तेल खुलं करण्याची योजना जाहीर केली आहे. अमेरिका आणि इस्राएलनं इराण बरोबर छेडलेल्या युद्धामुळे निर्माण झालेली तेलाची टंचाई दूर करण्यासाठी जगातले ३० देश या योजनेत सहभागी झाले आहेत. या आपत्कालीन उपाययोजनेमुळे जागतिक व्यवस्थेत अंदाजे ४० कोटी बॅरल्स तेल उपलब्ध होईल. जगाच्या तेल वाहतुकीचा महत्वाचा भाग असलेल्या ‘होर्मूझ’ समुद्रधुनीतल्या तणावाची मोठी झळ ऊर्जा बाजारपेठेला बसत आहे.

दरम्यान रशियाकडून तेल खरेदी करण्याची मुभा अमेरिकेनं भारताप्रमाणे इतर देशांना दिली आहे.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिकेदरम्यान अमली पदार्थ विरोधी सहकार्य बळकट करण्यासाठी परस्परांबरोबर गुप्त माहितीची देवाण-घेवाण करण्यावर नुकतीच चर्चा झाली. ऑस्ट्रियामध्ये व्हिएन्ना इथं आयोजित 'संयुक्त राष्ट्र अमली पदार्थ विरोधी आयोगा'च्या ६९ व्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, दोन्ही देशांच्या प्रतिनिधी मंडळांनी या चर्चेत भाग घेतला. यावेळी दोन्ही देशांनी एप्रिल २०२६ मध्ये अमेरिका-भारत अमली पदार्थ विरोधी कृती गटाची तिसरी बैठक घेण्याचा निर्णय घेतला. तसंच अमली पदार्थांच्या तस्करी विरोधात परस्परांच्या अधिकारक्षेत्रांमध्ये जलदगतीने आणि समांतर तपास करण्यासाठी गुप्त माहितीची देवाणघेवाण करण्यावर यावेळी चर्चा झाली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून २ दिवसांच्या आसाम दौऱ्यावर आहेत. गुवाहाटी इथं आज ते शेतकरी सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याचं वितरण करतील. सुमारे ९ कोटी ३२ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८ हजार ६४० कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरण पद्धतीनं जमा होणार असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना आतापर्यंत ४ लाख ९ हजार कोटींहून अधिक रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली असून हा हप्ता दिल्यावर आत्तापर्यंतची एकूण रक्कम ४ लाख २७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होईल, असंही चौहान यांनी

सांगितलं. या दौऱ्यात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ४७ हजार ८०० कोटी रुपयांच्या विकास कामांचं लोकार्पण आणि पायाभरणी होणार आहे.

<><><><>

मासिक पाळीच्या रजेसंदर्भात राष्ट्रीय धोरण ठरवण्याची मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. विविध आस्थापनांत काम करणाऱ्या महिला तसंच महाविद्यालयांतील विद्यार्थींना मासिक पाळीच्या रजेबाबत देशात समान धोरण करण्याची मागणी शैलेंद्रमणी त्रिपाठी यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सूर्य कांत आणि जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. अशा प्रकारची सक्ती केल्यास महिलांना नोकरी मिळणार नाही. तसंच अशा प्रकारची तरतूद केल्यास लिंगभेदावरील रूढींना बळकटी मिळेल, असं निरीक्षण न्यायालयानं यावेळी नोंदवलं.

स्वेच्छेनं दिल्या जाणाऱ्या सवलतींचं स्वागत आहे. परंतु त्याला कायद्याची चौकट दिली तर त्याचा दुष्परिणाम महिलांना सोसावा लागेल. असंही न्यायालयानं नमूद केलं.

<><><><>

हैदराबाद इथं सुरू असलेल्या पात्रता स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश मिळवल्यानंतर भारताच्या महिला हॉकी संघानं आगामी एफआयएच महिला हॉकी विश्वचषक २०२६ मध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे. नियमानुसार एफआयएच महिला हॉकी विश्वचषकाच्या दोन पात्रता स्पर्धा होतात, त्यातील एक भारतातील हैदराबाद इथं आणि दुसरी चिली मधील सॅन्टीएगो इथं होते. यामध्ये ७ संघांची आगामी विश्वचषकासाठी निवड होते. उपांत्य फेरीतील भारताचा सामना आज हैदराबादमध्ये इटली विरुद्ध होणार असला तरीही भारतानं या विश्वचषक स्पर्धेतील आपलं स्थान आधीच नक्की केलं आहे. भारत जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानी असून एफआयएच महिला हॉकी विश्वचषकामध्ये सहभागी होण्याची भारताची ही नववी वेळ असेल.

<><><><>

नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स ग्रां-पी २०२६ या स्पर्धेच्या कालच्या दुसऱ्या दिवशी भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी बजावली. पुरुषांच्या भालफेक

स्पर्धेत सुमीत अंतिल यानं सुवर्ण, पुष्पेंद्र सिंग यानं रौप्य तर पूनम राम यानं कांस्य पदक पटकावलं.

पुरुषांच्या धावण्याच्या ४०० मीटर टी 13 या प्रकारात भारतीय खेळांडूनी उत्तम कामगिरी बजावली. यामध्ये सुबोधकांत यानं सुवर्ण, प्रियांशु कौशिक यानं रौप्य आणि अवनिल कुमार यानं कांस्य पदक पटकावलं. तर पुरुषांच्या धावण्याच्या ४०० मीटर टी-46, टी-47 या प्रकारात भाविक कुमार यानं सुवर्ण तर जसबीर सिंह यानं रौप्य पदक मिळवलं.

४०० मीटर धावण्याच्या टी 11/ टी 12 प्रकारात तेजलबेन अमराजी दामोर हिनं सुवर्ण, ललिता कौलका हिनं रौप्य तर शालिनी चौधरी हिनं कांस्य पदक मिळवलं. महिलांच्या गोळा फेक स्पर्धेत लक्ष्मी हिनं सुवर्ण पदक तर अक्कुताई सीताराम उलभागट हिनं रौप्य पदक मिळवलं. पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धेच्या एफ-46 प्रकारात भारताच्या सुवर्ण पदक मिळवलं तर देवेंद्र सिंह यानं रौप्य आणि लोकेश अकोल यानं कांस्य पदक मिळवलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात येत्या १७ ते २० मार्च दरम्यान अवकाळी पावसाची शक्यता आहे. या काळात दुपारनंतर हवामान ढगाळ होऊन विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडू शकतो. काही ठिकाणी गारा पडण्याची शक्यता आहे.

सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेलं पीक सुरक्षित ठिकाणी साठवून किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसंच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचं नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन कृषी विभागाने केलं आहे.

**//<><><><><>//**